सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ६ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# हरियाणा, महाराष्ट्रानंतर जर भाजपाने दिल्ली जिंकली तर ...;

## देशाच्या राजकारणात होणार मोठे बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

गेल्या तिन्ही लोकसभा निवडणुकांत भाजपाने दिल्ली सर केली होती. सर्वच्या सर्व खासदार भाजपाचे होते. परंतू, विधानसभेत दिल्लीत भाजपाला काही केल्या यश मिळत नव्हते. काँग्रेसचे पतन करण्यात नवखी आप यशस्वी ठरली होती, आणि विजय साधेसुधे नव्हे तर ७० पैकी बहुतांश जागांवर विजय मिळविणारे होते.

लोकसभा निवडणुकीतील अपेक्षित नसलेल्या यशानंतर भाजपाची देशभरात पिछेहाट होईल असा अंदाज विरोधी पक्षांसह राजकीय धुरिणांनी बांधला होता. परंतू, तो हरयाणा, महाराष्ट्राच्या निवडणुकांनी फोल ठरविला आहे. आता तर दिल्लीतही २६ वर्षांनी भाजपा सत्तेत येत असल्याचा एक्झिट पोलचा अंदाज आहे. असे झाले तर हा विजय देशाच्या राजकारणात मोठे बदल करणारा ठरणार आहे.

गेल्या तिन्ही लोकसभा निवडणुकांत भाजपाने दिल्ली सर केली होती. सर्वच्या सर्व खासदार भाजपाचे होते. परंतू, विधानसभेत दिल्लीत भाजपाला काही केल्या यश मिळत नव्हते. काँग्रेसचे पतन करण्यात नवखी आप यशस्वी ठरली होती, आणि विजय साधेसुधे नव्हे तर ७० पैकी बहुतांश जागांवर विजय मिळविणारे होते. परंतू भाजपाला केजरीवालांनी पहिली संधी दिली ती कथित अबकारी घोटाळा करून.

दिल्लीत एकावर एक दारु बॉटल फ्री मिळू लागली, दारुवर प्रचंड मोठा डिस्काऊंट मिळू लागला होता. यावरून सुरु झालेले आरोप आप काही थोपवू शकली नाही. यानंतर शीशमहल घोटाळा बाहेर आला आणि केजरीवालांच्या इमेजला तडा गेला. आपच्या फ्रिबीजच्या स्कीमना तोड भाजपाला सापडत नव्हता, तो आपणहूनच केजरीवालांनी भाजपाला दिला. आता हिच निवडणूक देशाचे राजकारण बदलणारी आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींची लोकप्रियता घसरू लागल्याची चर्चा होत होती. परंतू, नंतर झालेल्या निवडणुकीत हरियाणा,



महाराष्ट्रातील भाजपाला प्रचंड विरोधानंतरही प्रचंड विजय मिळविल्याने मोदींचे पर्व पुन्हा सुरु झाल्याचे दिसत आहे. याला दिल्ली काबीज करून मोदी पुन्हा जुन्या फॉर्मात आल्याचा संदेश देशात जाणार आहे. असे झाले तर २०२९ मध्येही मोदीच भाजपाचे नेतृत्व करणार हे नक्की होणार आहे. मोदींना निवृत्त करण्याची किंवा ते होण्याची योजना गुंडाळून ठेवली जाऊ शकते.

२०२४ च्या भाजपच्या कमकुवत प्रदर्शनानंतर काँग्रेसला आपण एकटाच मोदींना हरविण्यात यशस्वी होऊ, अशी जी भावना वाटत होती ती संपुष्टात येणार आहे. हरयाणात, महाराष्ट्रात काँग्रेसला त्यांचा हाच आत्मविश्वास घेऊन बुडाला आहे. इंडी आघाडीला सोबत घेऊनच निवडणुका लढवाव्या लागणार आहेत. काँग्रेसला प्रादेशिक पक्षांना महत्व द्यावे लागणार आहे. नाहीतर येती बिहार, उत्तर प्रदेशच्या निवडणुकाही हातच्या जाण्याची शक्यता आहे. यामुळे कदाचित काँग्रेसला आपला हेका सोडून दुय्यम भूमिका घ्यावी लागू शकते.दिल्ली निवडणुकीत काँग्रेसला जास्त मते मिळाली आणि जर ती आपच्या जागा पाडण्यासाठी पुरेशी ठरली तरी देखील याचे उलटे परिणाम पंजाबवरही होऊ शकतात. प्रादेशिक पक्षांवर याचे उलटे परिणाम होऊ शकतात. सध्या काँग्रेसला डावलून कोणत्याच राज्यात विरोधक लढू शकत नाहीत, अशी परिस्थिती आहे. दुसरीकडे एनडीए एकजूट आहे. यामुळे कदाचित उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये सपा, राजदला दचकून रहावे लागणार आहे.

दिल्ली विजयानंतर भाजपा वक्फ बोर्ड विधेयक मंजूर करून घेण्याबाबत मोठ्या हालचाली करू शकते. यासाठी एनडीएच्या पक्षांना जनता भाजपासोबत आहे, हे दाखवून देण्यासाठी ही निवडणूक भाजपाला महत्वाची आहे. याचा परिणाम बिहार आणि उत्तर प्रदेशच्या निवडणुकांवरही दिसणार आहे.

लोकसभा निवडणुकीत आरएसएसने निवडणुकीच्या प्रचारापासून काहीसे अंग काढून घेतले होते. आम्हाला संघाच्या मदतीची गरज नाही, भाजपा आता आपल्या ताकदीवर पुढे जाऊ शकते, असे वक्तव्य अध्यक्ष जेपी नड्डा यांनी केले होते. याचा फटका लोकसभेला बसला, परंतू नंतर आरएसएस हरयाणा आणि महाराष्ट्रात सक्रीय झाली होती. दिल्ली विधानसभेतही संघाने मोठी मेहनत घेतली आहे. ऐन निवडणुकीपूर्वी संघाने ५० हजार ड्रॉईंग रुम चर्चा केल्या आहेत. लोकांना घराघरात जाऊन समजावले आहे. भाजपा का जिंकावी हे सांगितले आहे. दिल्ली निवडणूक संघाची गरज भाजपाला किती आहे, हे देखील दाखवून देणारी आहे.

# भारतीयांना हद्दपार करताना अमेरिकेकडून अमानुष वागणूक, संसदेत विरोधकांची जोरदार घोषणाबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नवी दिल्ली**

अमेरिकेत बेकायदेशीरपणं राहणाऱ्या भारतीयांच्या हद्दपारीच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी काँग्रेसचे माणिकम टागोर यांनी लोकसभेत स्थगन प्रस्ताव मांडला. त्यांनी प्रस्तावात म्हटलं की, अमेरिकेनं भारतीय नागरिकांना अमानुष आणि अपमानास्पद पद्धतीने हद्दपार करण्यास सुरुवात केली आहे. निर्वासितांना बेड्या घालून सैन्यदलाच्या विमानातून आणण्यात आले. हे त्यांच्या आत्मसन्मानाचं स्पष्ट उल्लंघन आहे.

बेकायदेशीरपणं राहणाऱ्या भारतीयांना दिलेल्या अपमानास्पद वागणुकीवरून लोकसभा आणि राज्यसभेत




गदारोळ झाला. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज गुरुवारी दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.लोकसभेत विरोधी पक्षाच्या खासदारांना संसदेत जोरदार घोषणाबाजी केली. भारतीय नागरिकांना परत पाठवण्याच्या मुद्द्यावर चर्चा करावी, अशी विरोधकांनी मागणी लावून धरली. त्यावर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी कामकाजात अडथळा आणू नका, असे विरोधी पक्षाच्या खासदारांना आवाहन केलं. हद्दपारीचा विषय परराष्ट्र मंत्रालयाचा आहे. त्याची सरकारनं दखल घेतली आहे. प्रश्नोत्तराचा तास हा महत्त्वाचा आहे. त्यामध्ये नागरिकांच्या समस्येवर खासदारांनी विचारलेल्या प्रश्नावर सरकारकडून उत्तर देण्यात येते, असे लोकसभा अध्यक्षांनी सांगितले.

### विरोधकांनी हातकड्या घालून केला निषेध

अमेरिकेतून कथित बेकायदेशीर भारतीय स्थलांतरितांना मायदेशी परत पाठवण्याच्या मुद्द्यावर विरोधक आक्रमक झाले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते, खासदार राहुल गांधी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्यासह विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेबाहेर निदर्शने केली.काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल, समाजवादी पक्षाचे खासदार धर्मेंद्र यादव, काँग्रेसचे खासदार गुरजीत सिंह औजला आणि काही इतर नेत्यांनी हातकड्या घालून निषेध केला.

# करुणा शर्माचा कोर्टात मोठा विजय धनंजय मुंडेंना झटका, पोटगी देण्याचा आदेश

## राजकीय दृष्ट्या अडचणीत सापडलेल्या धनंजय मुंडे यांच्या अडचणी आणखी वाढल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६बीड**

आधीच राजकीय दृष्ट्या अडचणीत सापडलेल्या धनंजय मुंडे यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. कोर्टात करुण शर्मा यांचा मोठा विजय झाला आहे. करुणा शर्मा यांनी धनंजय मुंडे यांच्यावर केलेले आरोप कोर्टाने अंशत: मान्य केले आहेत. करूणा शर्मा यांना दरमहा २ लाख रुपये पोटगी देण्याचे आदेश फॅमिली कोर्टाने दिले आहेत. आपण धनंजय मुंडे यांच्या पत्नी आहोत असा करुण शर्मा यांचा दावा होता.



त्यासाठी मागच्या काही वर्षापासून त्या कायदेशीर लढाई लढत होत्या. आज त्यांना यश मिळालं आहे. फॅमिली कोर्टाने करुणा शर्मा यांचा दावा मान्य केला आहे. करुणा शर्मा या धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी आहेत हे कोर्टाने मान्य केलय.

कौटुंबिक पती-पत्नीचा विषय असल्याने त्यांनी वांद्रे फॅमिली कोर्टात दाद मागितली होती. दोन्ही बाजूंच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर कोर्टाने करुणा शर्मा या धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी असल्याच मान्य केलं. त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर घरगुती हिंसाचाराचा सुद्धा आरोप केला होता. पती-पत्नी वेगळे राहत असतील किंवा घटस्फोट झाल्यास पोटगीची रक्कम द्यावी लागते. फॅमिली कोर्टाने धनंजय मुंडे यांना दर महिना पोटगीपोटी करूणा शर्मा यांना २ लाख रुपये देण्याचे आदेश दिले आहेत.

# राज्यातील सर्व उपसा सिंचन योजना सोलरवर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६बीड**

राज्यातील सर्व उपसा सिंचन योजना सोलरवर टाकल्या जाणार आहेत. त्यामुळे वीज बिलाचा बोजा शेतकऱ्यांवर येणार नाही, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केली.

छत्रपती संभाजीनगर आष्टी उपसा सिंचन योजना क्र. ३ अंतर्गत शिंपोरा ते खुंटेफळ पाइपलाइन कामाची पाहणी, तसेच बोगदा कामाचा प्रारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते



बुधवारी झाला. त्यावेळी ते बोलत होते. जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री पंकजा मुंडे, खा. बजरंग सोनवणे, आ. सुरेश धस, आ. प्रकाश सोळंके, आ. संदीप क्षीरसागर, आ. नमिता मुंदडा, आ. विजयसिंह पंडित, आ. नारायण पाटील, आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जी १६ हजार मेगावॅट वीज लागते ती सर्व सोलरवर घेतली जाईल. याचे काम डिसेंबर २०२५ किंवा मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होईल. यामुळे आठ रुपये युनिटऐवजी तीन रुपयांनी वीज मिळून पाच रुपये वाचतील. या वाचलेल्या पैशांतून घरगुती, औद्योगिक वापराची बिले कमी करू.

### पुढील पिढी दुष्काळ पाहणार नाही

समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात आणावे लागेल. हे ५३ टीएमसी पाणी आले तर मराठवाड्याची पुढील पिढी दुष्काळ पाहणार नाही. मराठवाड्यातील पाण्याचा दुष्काळ हा भूतकाळ होईल. एवढेच नव्हे तर चार नदीजोड प्रकल्पांमुळे मराठवाड्यासह विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रदेखील दुष्काळमुक्त होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

# कंपन्यांना त्रास देणाऱ्या गुंडांना मकोका लावा : फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६पुणे**

कंपन्यांना त्रास देणाऱ्या वसुली करणाऱ्या पोलीस किंवा कार्यकर्त्यांना थेट मकोका लावा असा इशारा मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. ते पुण्यामध्ये आज विविध प्रकल्पांचे उदघाटन, लोकार्पण व भूमिपूजन सोहळा पार पडला. त्यावेळी त्यांनी पिंपरी चिंचवड येथे पोलीस आयुक्तालयाच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते.



यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, पुण्याचा व्याप आणि विस्तार मोठा असल्याने पुण्यातून पिंपरी चिंचवड येथे पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर आता या आयुक्तालयाच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन पार पडलं. या हे देशातील सर्वांत आधुनिक पोलीस आयुक्तालय हे पिंपरी चिंचवडचं असणार आहे. अजित पवारांच्या अस्थेटीक सेन्समुळे या इमारतीच्या डिझाईनमध्ये मदत झाली. असं म्हणत फडणवीसंनी यावेळी पवारांचं कौतुकही केलं.

# आ.सुलभा खोडके यांची ना. दादाजी भुसे यांच्याशी भेट व चर्चा : राज्य शिक्षक संघाच्या विविध मागण्यांकडे वेधले शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

राज्याचे शालेय शिक्षण मंत्री नामदार - दादाजी भुसे हे आज दिनांक ०६ फेब्रुवारी २०२५ रोजी अमरावतीच्या दौऱ्यावर आले असता आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी त्यांचे शासकीय विश्राम गृह येथे स्वागत केले. यावेळी आमदार महोदयांनी राज्य शिक्षक संघाच्या शिष्टमंडळासमवेत मंत्री महोदयांशी संवाद साधतांना शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत चर्चा केली.

वर्ष १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना नवीन पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे. परंतु १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त असूनही विनाअनुदानित ,अंशतः अनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांना केवळ १०० टक्के अनुदानावर १ नोव्हेंबर २००५ नंतर आले असल्याच्या कारणास्तव जुनी पेन्शन योजना नाकारण्यात आली आहे. त्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना





लागू करण्यात यावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच डिसेंबर १९७७ च्या धोरणात्मक निर्णयानुसार केंद्रातील कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील शिक्षकांना वेतनश्रेणी व लाभ देण्याचे मान्य करण्यात आले आहे. परंतु निवडश्रेणीच्या बाबत केंद्रातील शिक्षक व राज्यातील शिक्षकांबाबत भेदभाव करण्यात येते. केंद्रीय विद्यालयातील सर्व शिक्षकांना निवड श्रेणीचा लाभ देण्यात येत असून राज्यातील केवळ २० टक्के शिक्षकांना निवड श्रेणीचा लाभ देण्यात येत आहे. हा भेदभाव दूर करून राज्यातील सर्व शिक्षकांना निवडश्रेणीचा लाभ देण्याची मागणी आमदार सौ. सुलभाताई खोडके व राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष दिलीप कडू यांनी शालेय शिक्षण मंत्री ना. दादाजी भुसे यांना निवेदनाद्वारे केली आहे.याबाबत शासन सकारात्मक असल्याचे मंत्रीमहोदयांच्या वतीने सांगण्यात आले.या संदर्भात ना. दादाजी भुसे यांनी सकारात्मक आश्वासन दिले आहे. निवेदन देतेवेळी राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष दिलीप कडू, राज्य शिक्षक संघटनेचे ललित चौधरी, प्रदीप नानोटे, नंदकिशोर नवरे, नंदकिशोर खडसे, कैलास कडू ,मंजु अडवाणी,संदीप रक्षित, राजीक खा पठाण, आदींसह शिष्टमंडळातील शिक्षक-कर्मचारी उपस्थित होते.

### जिल्हा परिषद व महानगरपालिका शाळेची शिक्षणमंत्र्याकडून पाहणी

राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे आज अमरावती जिल्हाच्या दौऱ्यावर आले आहेत, दरम्यान मंत्री दादा भुसे यांनी सुरवाडी, तिवसा, गुरूकुंज मोझरी व अमरावती महानगरपालिकेच्या शाळेत भेट देऊन पाहणी केली, यावेळी शिक्षणमत्र्यांनी विद्यार्थीशी संवाद साधला व शाळेत कशा प्रकारे शिक्षण शिकवल्या जातं याचा आढावा घेतला, यावेळी विद्यार्थ्यांनी दादा भुसे यांचा शाळेत स्वागत केलं, त्यानंतर शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयात पाचही जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक घेत शैक्षणिक सत्राचा आढावा घेतला.

## संपादकीय ......

# कर्म आणि देवदर्शन

आज-काल देशभरामध्ये घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये सापडणारे आरोपी हे देवभक्त आहेत, असे तुमच्या लक्षात येईल. महाराष्ट्रातील छोट्या व मोठ्या गावांमधील गुन्हेगार हे देवभक्त असतात हे त्यांच्या वर्णनावरून लक्षात येते. एखादा खून खटला गाजत असेल आणि त्यामध्ये सात आरोपी असतील तर त्या सात पैकी किमान सहा जणांनी ठळक असे कुंकू कपाळावर लावलेले असते. मुख्य आरोपी असेल तर त्याने चंदन आणि हळद कपाळावर चांगल्यापैकी फासलेले असते. काही गुन्हेगार तर नुकतेच जेजुरीला केव्हा कुठल्यातरी मोठ्या मंदिराला जाऊन आलेत की काय, असे वाटावे इतके भाविक दिसतात.

कोणताही देव अपराधाला क्षमा करत नाही. गुन्हा करणारा व्यक्ती किंचितसा घाबरलेला असतो त्यामुळेच तो फरार होण्याच्या काळामध्ये देवदेव करत असतो. उज्जैनला सापडला, शिर्डीमध्ये दिसला अशा बातम्या वाचण्यात आल्या की लक्षात येते की, भाऊ सध्या देव देव करत आहेत. कदाचित आपल्याकडून घडून गेलेल्या अपराधाचा उतारा म्हणून ते देवदर्शन करीत असावेत. मुख्य आरोपी सापडते तेव्हा त्याच्या हातामध्ये भरपूर गंडेदोरे बांधलेले असतात. कायद्यापुढे गंडेदोरे टिकत नाहीत आणि कलमांचा फास त्याला वाचू शकत नाही. या गुन्हेगारीच्या मानसिक अवस्थेमध्ये देवच आपल्याला वाचवू शकेल, अशी काही आरोपींची श्रद्धा असू शकते. आरोपी स्वतःहून शरण येताना बर्‍यापैकी देव-देव करून आलेला असतो. याचे चिन्ह म्हणून त्याच्या कपाळावर भरपूर कुंकू लावलेले असते आणि त्याने हातामध्ये भरपूर गंडेदोरे बांधलेले असतात.

महिलांचा सहभाग गुन्ह्यांमध्ये कमी आहे, असे आपल्या लक्षात येईल. संघटित गुन्हेगारी करण्याइतपत त्या एकत्र येण्याची शक्यता नसते. महिलांचे गुन्हे हे सहसा शेजारणी बरोबर किंवा सार्वजनिक नळावर काम पडल्यास हात चालवण्याइतकी मर्यादित असते. कमी गुन्हे असण्याच्या नोंदीमुळे महिला या कुंकू लावणार्‍या पुरुष गुन्हेगारांपेक्षा चांगल्या आहेत, असे म्हणावे लागेल. आपल्या संस्कृतीमध्ये महिला या नेहमी वृत्तवैकल्य करणे आणि कुटुंबासाठी कष्ट करणे यात व्यस्त असतात. नियमित देवदर्शन आणि जमल्यास बाहेर गावची यात्रा असेच त्यांचे कामाचे स्वरूप असते. गुन्हेगार फरार असण्याच्या काळामध्ये तीर्थक्षेत्री जाण्याची अनेक कारणे असू शकतात. तीर्थक्षेत्रांना गर्दी खूप असते त्यामुळे तिथे गुन्हेगार सहज लपून राहू शकतात. शिवाय तिथे असलेले देव वाचवायला आले तर आणखीनच चांगले, असा त्यांचा विचार असावा.

तुम्हा-आम्हा सामान्य लोकांना मात्र असे गुन्हेगार टीव्हीवर दिसल्यानंतर त्याच्यात अजूनही माणुसकी शिल्लक असावी; कारण तो देवाला मानतो, अशी भावना निर्माण होत असते. देवालाही न घाबरणारे आणि प्रत्यक्ष देवळात चोरी करणारे सुद्धा बहाद्दर चोर आपल्या देशामध्ये आहेत. ते देवी देवतांच्या मूर्ती पळवून नेतात किंवा दक्षिणेच्या पेट्या चोरून घेऊन येतात. देवळात चोरी करण्याबद्दल एखाद्या चोराला तुम्ही विचारले तर तो तुम्हालाच प्रति प्रश्न विचारू शकतो, की चराचरात देव आहे तर मग कुठेही चोरी केली तर काय फरक पडतो? एकंदरीत पाहता गुन्हेगारांचे आणि तीर्थक्षेत्र असलेल्या गावांचे जवळचे नाते आहे, असे लक्षात येईल.

# २०२५ मध्ये महाशिवरात्री व्रत नेमके कधी करावे?

## २६ की २७ फेब्रुवारी? नेमकी महाशिवरात्री कधी?

### शुभ मुहूर्त अन् निशीथकालाची वेळ जाणून घ्या...

**दि. ६ विदर्भ प्रजासत्ताक**

महाशिवरात्री हे शिवभक्तांच्या दृष्टीने अत्यंत पवित्र असे एक व्रत आहे. तसे पाहिले तर प्रत्येक महिन्यातील वद्य चतुर्दशीची रात्र ही शिवरात्र मानली जाते; परंतु माघ वद्य चतुर्दशीची रात्र ही महाशिवरात्र म्हणून विख्यात असून, त्या रात्री शंकराची पूजा केली असता सर्व प्रकारच्या पापांचा नाश होऊन शिवलोकाची प्राप्ती, शिवाशी तादात्म्य, मोक्ष इ. फळे मिळतात, अशी शिवभक्तांची श्रद्धा असते. चतुर्दशी दोन दिवसांत विभागलेली असेल, तर ज्या मध्यरात्री चतुर्दशी येत असेल, ती शिवरात्र मानली जाते. यावरून शिवरात्रीचा कालनिश्चय करताना दिवसाला महत्त्व नसून रात्रीला महत्व आहे, हे स्पष्ट होते. सन २०२५ मध्ये महाशिवरात्री नेमकी कधी साजरी करावी? व्रताचे महत्त्व आणि काही मान्यता जाणून घेऊया...

नित्यशिवरात्र, पक्षशिवरात्र, मासशिवरात्र, योगशिवरात्र व महाशिवरात्र असे शिवरात्रीचे पाच प्रकार आहेत. पैकी महाशिवरात्री ही सर्वश्रेष्ठ मानली जाते. दररोजची रात्र ही नित्यशिवरात्र, शुद्ध चतुर्दशीची रात्र ही पक्षशिवरात्र, प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्दशीची रात्र ही मासशिवरात्र आणि योग सामर्थ्याने निर्माण केलेली रात्र ही योगशिवरात्र मानली जाते. महाशिवरात्रीचे व्रत कसे करावे, याविषयी तपशीलवार विवेचन विविध ग्रंथांतून आढळते. माघ वद्य त्रयोदशीला एक वेळ भोजन करून रहावे, चतुर्दशीच्या दिवशी सकाळी व्रताचा संकल्प केला जातो. स्नान, शिवपूजन द्वारे व्रत पूर्ण करावे. उपवास, पूजा व जागरण ही या व्रताची तीन प्रमुख अंगे आहेत. रात्रीच्या ४ प्रहरांपैकी प्रत्येक प्रहरामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने शिवाची पूजा केली जाते. तिला यामपूजा असे म्हटले जाते. पूजा करताना शिवाला विशेष प्रिय म्हणून बेल, आंबा वगैरेंची पाने वाहिली जातात. विशिष्ट वर्षे व्रत केल्यानंतर त्याचे उद्यापन करता येते.

**सन २०२५ मध्ये महाशिवरात्री नेमकी कधी साजरी करावी?**

महाशिवरात्रीला भारतातील काशी, रामेश्वरम्, गोकर्ण, वैजनाथ, शिखर-शिंगणापूर इ.असंख्य शिवक्षेत्रांमधून यात्रा भरतात. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्री आहे. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजून ०८ मिनिटांनी माघ वद्य चतुर्दशी सुरू होत आहे. तर २७ फेब्रुवारी २०२५ रोजी ०८ वाजून ५४ मिनिटांनी चतुर्दशीची सांगता होत



आहे. अन्य व्रतांमध्ये पंचांगानुसार, सूर्योदयाची तिथी मानण्याची प्राचीन परंपरा आहे. परंतु, महाशिवरात्री व्रतात निशीथकालाला महत्त्व असून, या दिवशी करायचे शिवपूजन प्रदोष काळानंतर रात्री केले जाते. त्यामुळे २६ फेब्रुवारी २०२५ च्या रात्री शिवपूजन करावे, असे सांगितले जात आहे.

**महाशिवरात्री २०२५चे शुभ मुहूर्त**- महाशिवरात्रीला जलाभिषेक, रुद्राभिषेकाला अनन्य साधारण महत्त्व आहे. जलाभिषेकाचा रात्रौ ०८ वाजून ५४ मिनिटांपासून ते १२ वाजून ०१ मिनिटांपर्यंत शुभ मुहूर्त मानला गेला आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी ४ प्रहर पूजा करण्याचे विशेष महत्त्व आहे. पहिला सायंकाळी ६ वाजून १८ मिनिटांपासून ते रात्री ९ वाजून २५ पर्यंत असेल. दुसरा रात्री ९ वाजून २६ मिनिटांपासून वाजता सुरू होईल. रात्री १२ वाजून ३५ मिनिटांपर्यंत असेल. तिसरा प्रहर मध्यरात्री १२ वाजून ३५ मिनिटांपासून ते उत्तररात्रो ३ वाजून ४२ मिनिटांपर्यंत असेल. चौथा आणि शेवटचा प्रहर २७ फेब्रुवारी २०२५ रोजी पहाटे ३ वाजून ४१ मिनिटांनी सुरू होईल आणि सकाळी ६ वाजून ४७ मिनिटांपर्यंत असेल. महाशिवरात्रीला सर्वांत महत्त्वाचा मानला गेलेला निशीथकाल रात्री १२ वाजून २७ मिनिटांपासून ते ०१ वाजून १६ मिनिटांपर्यंत असेल.

**महाशिवरात्री व्रताच्या काही मान्यता** -देवांचे देव आणि तिन्ही लोकांचे स्वामी महादेवांचा हा सर्वात मोठा उत्सव असतो. या दिवशी भक्तीभावे शिवाची आराधना केल्यास भगवान शंकर प्रसन्न होतात आणि शिवभक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात असे मानले जाते. काही कथांनुसार, समुद्र मंथनातून निघालेले हलाहल याच दिवशी शंकरांनी प्राशन केले होते आणि जगाला विनाशापासून वाचवले. हेच ऋण फेडण्याचा दिवस म्हणजेच महाशिवरात्री होय, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते. तर काही कथांनुसार, या दिवशी शिव आणि पार्वतीचा विवाह झाला होता. काही ठिकाणी या दिवसाला 'जलरात्री' असे संबोधले जाते. महाशिवरात्रीचा महिमा मोठा असल्याचे सांगितले जाते. शिवतत्त्व या दिवशी प्रथम पृथ्वीवर अवतरल्यामुळे हा दिवस महाशिवरात्री म्हणून साजरा केला जातो, असेही म्हटले जाते.

# उन्हाळी हंगामात कमी कालावधीचे हे कडधान्य पिक ठरतंय फायदेशीर




**दि ६.विदर्भ प्रजासत्ताक** उन्हाळी हंगामात मूग लागवड फायदेशीर ठरत आहे. कमी कालावधीचे पीक असल्यामुळे जानेवारी ते फेब्रुवारी यादरम्यान मुगाची पेरणी करावी. या पिकाला मध्यम ते भारी स्वरूपाची जमीन मानवते.जमिनीची उभी-आडवी नांगरट करून ढेकळे फोडून माती बारीक करावी. फळी मारून जमीन सपाट करावी.

**योग्य वाणांची निवड**- १) विद्यापीठाने रब्बी हंगामासाठी दापोली मूग-१ ही जात कोकणासाठी शिफारस केली असून हे वाण ७१ ते ७५ दिवसात तयार होते. सरासरी उंची ५० ते ५५ सेमी असून, वाणापासून १२ ते १५ क्विंटल एवढे हेक्टरी उत्पादन मिळते.२) पुसा-वैशाखी, वैभव, फुले एम-२, कोपरगांव, जळगाव-७८१, टी. ए. पी - ७, तैवान मूग, ट्रॉम्बे मूग बीन या ६० ते ७५ दिवसांत होणाऱ्या हेक्टरी सात ते २० क्विंटल उत्पादन देणाऱ्या सुधारित जातीची शिफारस केली आहे.

**बीजप्रक्रिया कशी करावी ?**

बियाण्याला प्रती किलोस २.५ ग्रॅमप्रमाणे प्रथम बुरशीनाशकाची आणि शेवटी पेरणीपूर्वी २५ ग्रॅम रायझोबियम जीवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी.

**लागवड कशी कराल ?**

हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फूरद पेरणीपूर्वी सरीमध्ये बियाण्याखाली देऊन मातीमध्ये मिसळून घ्यावे व नंतर पेरणी करावी. लागवडीसाठी ३० सेंटीमीटर बाय १० सेंटीमीटर अंतर ठेवावे.काराचे सपाट वाफे करून दोन वाफ्यांमध्ये पाण्याचे पाट ठेवावेत.

**पाणी व्यवस्थापन**-या पिकाला १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाच पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. फांद्या फुटण्याची वेळ, पीक फुलोऱ्यात असताना आणि शेंगामध्ये दाणे भरण्याच्या काळात पाण्याचा ताण बसणार नाही, याची काळजी घ्यावी.

**आंतरमशागत**- पिकाची उगवण झाल्यानंतर १० दिवसांनी नांगे भरावेत आणि आवश्यकतेनुसार पिकाची विरळणी करून घ्यावी. साधारणपणे १५ ते १८ दिवसांनी कोळपणी करावी, तसेच ४० दिवसांनी बेणणी करावी.

**पिक संरक्षण**- पाने खाणारी अळी, तुडतुडे व मावा या किडीपासून मूग पिकाचे संरक्षण करण्यासाठी गरजेनुसार ६०० मिली प्रवाही मोनोक्रोटोफॉस ५०० लि. पाण्यात मिसळून एक हेक्टर क्षेत्रावर फवारा द्यावा. करपा रोगांचा प्रादुर्भाव आढळल्यास एक हेक्टर क्षेत्रावर फवारा द्यावा करपा रोगांचा प्रादुर्भाव आढळल्यास एक लिटर पाण्यात २.५ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराइड या प्रमाणात मिसळून फवारणी करावी.









**शेंगा तोडणी**

शेंगा पक्व झाल्यानंतर म्हणजेच पेरणीनंतर साधारणतः ६० ते ७० दिवसांनी या पिकाच्या शेंगाची तोडणी करावी. शेंगाचा हिरवा रंग बदलून तो पिवळसर तपकिरी होऊ लागतो. त्यावेळी हिरवा रंग बदलून तो पिवळसर तपकिरी होऊ लागतो. त्यावेळी शेंगा तोडणीस तयार होतात. ऊशिरा वा कडक उन्हात तोडणी करू नये, अन्यथा शेंगा तडकून उत्पन्नात घट होते. शेंगांची तोडणी शक्यतो सकाळी करावी म्हणजे शेंगा तडकत नाहीत. पक्व शेंगांची तोडणी दोन ते तीन वेळा करावी.

**मुगाला चांगली मागणी**

बाजारपेठेत मुगाला चांगली मागणी असून दरही चांगला आहे. त्यामुळे उन्हाळी पिकासाठी मूग लागवड फायदेशीर ठरत आहे. स्वच्छ सूर्यप्रकाश व हवामान उष्ण असल्यामुळे पीक चांगले येते. विशेष म्हणजे या कालावधीत कीडरोगाचा प्रादुर्भाव फारसा होत नाही. सिंचनाची सुविधा असेल, तर मुगाचे उत्पादन चांगले मिळते. लागवडीनंतर ६० ते ६५ दिवसांत पीक काढणीसाठी तयार होते.




## वर्कआउटनंतर थंड पाणी पित असाल तर वेळीच व्हा सावध, जाणून घ्या नुकसान !

**दि. ६ विदर्भ प्रजासत्ताक**

रोज जिममध्ये किंवा घरी वर्कआउट करणं अनेकांच्या जगण्याचा भाग झालं आहे. वर्कआउट करताना भरपूर घाम जातो, ज्यामुळे भरपूर पाणी पिण्याचा सल्ला एक्सपर्ट देत असतात. पण बरेच लोक असेही असतात जे वर्कआउट दरम्यान किंवा त्यानंतर थंड पाणी पितात. मात्र, अनेकांना हा प्रश्न पडतो की, वर्कआउटनंतर थंड पाणी प्यावं की नाही? याच प्रश्नाचं उत्तर आम्ही देणार आहोत.

एक्सपर्टनुसार, वर्कआउटनंतर थंड पाणी पिणं शरीरासाठी नुकसानकारक ठरू शकतं. कारण वर्कआउट दरम्यान शरीराचं तापमान वाढत असतं. अशात वर्कआउटनंतर लगेच जेव्हा तुम्ही थंड पाणी पिता तेव्हा शरीराचं तापमान एकएकी कमी होतं. अशात तुम्ही जिममध्ये केलेली अनेक तासांची वर्कआउटची मेहनत पूर्णपणे वाया जाते. यासोबतच सर्दी होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे वर्कआउटनंतर नेहमीच नॉर्मल पाणी प्यावं. यानं शरीराचं वजन कमी होईल. सोबतच तुम्हाला नुकसान होण्याचा धोकाही कमी असेल.

**वजनही वाढू शकतं**

जेव्हा तुम्ही वर्कआउटनंतर थंड पाणी पिता तेव्हा तुमचं वजनही वाढू शकतं. खासकरून बेली फॅट वाढण्याची शक्यता अधिक असते. अशात जर तुम्ही वर्कआउटने वजन कमी करण्याचा विचार करत असाल तर थंड पाणी अजिबात पिऊ नका.

**हार्ट रेटवर प्रभाव**

वर्कआउटनंतर थंड पाणी प्यायल्यानं हृदयाच्या गतिवरही प्रभाव पडतो. वर्कआउट दरम्यान तुमच्या




नसांमध्ये वेगानं ब्लड सर्कुलेशन होतं आणि अचानक थंड पाणी प्यायल्यास नसा थंड होतात. अशात हृदयाची गति आणि ब्लड सर्कुलेशन स्लो होतं. कधी कधी ही स्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे वर्कआउट केल्यावर लगेच थंड पाणी पिऊ नये.

**डोकं दुखेल**

वर्कआउटनंतर तुम्ही जर थंड पाणी प्याल तर तुम्हाला डोकेदुखी आणि सायनसची समस्याही होऊ शकते. खासकरून तुम्ही जेव्हा आइस क्यूबवालं पाणी पिता तेव्हा यानं तुमच्या नसा थंड होतात. अशात याचा प्रभाव तुमच्या डोक्यावर पडतो. ज्यामुळे डोकेदुखीची समस्या होऊ लागते

# गुणवंत धिकारचे केवळ ४ हजेरी पत्रकाची मजुरी देय

## मृत्यू प्रकरणी आरोप चुकीचा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती,** गांगरखेडा येथील गुणवंत धिकार यांच्या मृत्यू प्रकरणी रोहयोमधील मजुरी मिळालेली नसल्याने आत्महत्या केल्याचा आरोप चुकीचा आहे. गुणवंत धिकारचे केवळ चार हजेरी पत्रकांची ३ हजार ७७५ रूपये मजुरी देणे असल्याचे चिखलदरा तहसिलदार यांनी स्पष्ट केले आहे.महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत चिखलदरा तालुक्यातील गांगरखेडा येथील गुणवंत काल्या धिकार, जॉब कार्ड क्र एमएच-२४-०११-२३०-००१/९६४ मग्रारोहयो कामावरील मजुराने आत्महत्या केली, त्याअनुषंगाने एमआयएसवरील गुणवंत धिकार या मजुराची प्रदाना संबंधीत माहिती संकेतस्थळावर तपासली गुणवंत धिकार यांनी चालु आर्थिक वर्षात एकुण १४ हजेरी पत्रकावर काम केल्याचे अहवालानुसार दिसून येते. त्यापैकी १० हजेरी पत्रकाचे ९ हजार ११३ रुपये मजुरी प्रदान करण्यात आली आहे. यात उर्वरित ४ हजेरी पत्रकावरील ३ हजार ७५५ रूपये एवढी रक्कम मजुरी निधी अभावी प्रलंबीत आहे. तसेच सध्यस्थितीत चालु असलेल्या हजेरी पत्रक क्रमांक ११५५३१ कालावधी दि. ३० जानेवारी २०२५ ते दि. ५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत हजेरी पत्रकावरील कालावधी सुरु झाल्यापासून कामावर उपस्थित नाही, असे तहसिलदार आणि गटविकास अधिकारी, चिखलदारा यांनी कळविले आहे.

# धारणी येथे रविवारी विधी सेवा महाशिबीर, शासकीय योजनांचा महामेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६धारणी** -राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा. मुंबई यांच्या वतीने धारणी येथील जिल्हा परिषद शाळेचे मैदानावर विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. रविवार, दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

धारणी शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर होत असलेल्या या महामेळाव्याला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, न्यायमूर्ती अभय ओक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर, न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे, उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूरचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, पालक न्यायमूर्ती वृषाली जोशी उपस्थित राहणार आहेत महा मेळाव्यामध्ये वंचित, दुर्बल घटक, कामगार, दिव्यांग, महिला आदींना विधी सेवा प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली जाणार आहे. तसेच इतर शासकीय विभागाच्या योजनांची माहिती आणि त्यांच्या समस्या जाणून कायदेशीर मार्गदर्शन करण्यात येणार आहे तसेच गरजू आणि पात्र नागरिकांना कल्याणकारी योजनांचा लाभ दिल्या जाणार आहे. यात ३२ हजार लाभार्थी निवडण्यात आले असून रविवारी दिड हजारावर नागरिकांना लाभ देण्यात येणार आहे.शिबीरामध्ये विविध शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, तसेच कायदेतज्ज्ञांनाचा



सहभाग राहणार आहे. सोबतच मोफत कायदेविषयक सल्ला, इतर योजनाचे सामाजिक कल्याणकारी फायदे आणि विविध कायदेशीर हक्कांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.नागरीकांनी विधी सेवा आणि शासकीय योजनाचा लाभ घेण्याकरीता मेळाव्याला उपस्थित राहावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सुधाकर यार्लगड्डा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव मंगला कांबळे यांनी केले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ६ फेब्रुवारी २०२५ शहर/ग्रामिण

## उद्यापासून अमरावती जिल्हा वकील संघाचे स्नेहसंमेलन

### अंताक्षरी, कॅरम स्पर्धा, फॅशन शो, संगीत रजनी आर्केस्ट्रा, वादविवाद स्पर्धा राहणार आकर्षण




विदर्भ प्रजासत्ताक

**दि.६अमरावती–** अमरावती जिल्हा वकील संघाच्यावतीने फ्युजन फिएस्टा स्नेहसंमेलनाचे ३ दिवसीय आयोजन अमरावती जिल्हा व सत्र न्यायालय परीसरात करण्यात आले आहे. ७ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६.३० वाजता उद्घाटन समारंभआयोजीत करण्यात आला आहे.

३ दिवसीय फ्युजन फिएस्टा समारंभामध्ये उदघाटक म्हणून एस. जी. मेहरे न्यायमूर्ती मुबंई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ तर प्रमुख अतिथी म्हणून एस. व्ही. यार्लगडा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश अमरावती व अतिथी म्हणून आर. आर. पोंदकुले प्रमुख न्यायाधिश, कौटुबिक न्यायालय, अमरावती उपस्थित राहणार आहेत तर कार्यकमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. विश्वास काळे हे राहणार आहेत. ७ फेबुवारी रोजी सांस्कृतीक कार्यक्रम रंग संस्कृतीचा रंग कलेचा स्व. अॅड. डी. एन. बाबरेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे प्रायोजक अॅड. संजय बाबरेकर व त्यांचे सहकारी आहेत. त्याच दिवशी हिंन्दी एकांकिका किस्सा कुर्सी का आयोजित असून याचे प्रायोजक अॅड सै. खालीद अली हे आहेत. तसेच मराठी एकांकिका उठता लात बसता बुक्की स्व. अॅड. एम. डी. श्रीमाळी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे प्रायोजक अॅड. डी. एम. श्रीमाळी आहे. त्यानंतर ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता पुष्पप्रदर्शनी व रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे प्रायोजक अॅड. किशोर शेळके हे आहेत. अशासारखे विविध कार्यक्रम तीन दिवस आयोजित करण्यात आले.

त्यामध्यें अंताक्षरी, कॅरम स्पर्धा, फॅशन शो, संगीत रजनी आर्केस्ट्रा, वादविवाद स्पर्धा, बक्षीस वितरण सोहळा, आयोजीत करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या मनोरंजनाचा लाभ अमरावती जिल्हयातील संपूर्ण वकील बांधवानी घ्यावा, असे आवाहन अमरावती जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अॅड. विश्वास काळे, अॅड. चंद्रसेन बी. गुळसुंदरे, अॅड. नितीन डी. राउत, अॅड. मो. वसीम शेख, अॅड. सोनाली ए. महात्मे, अॅड. शाहु एन. चिखले, अॅड. सारीका ए. भोंगाडे/ठाकरे, अॅड. विक्रम सरवटकर, अॅड. सुरज जी. जामठे, अॅड. गजानन एन. गायकवाड, अॅड. मांगल्य डी. निर्मळ, अॅड. राजु म. कलाने यांनी केले आहे.–

## अमरावतीच्या तीन काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा प्रताप

## नागपुरच्या महिला काँग्रेसच्या पदाधिकाऱ्याला १५ लाखांचा गंडा

**रेल्वे महामंडळावर नियुक्तीचे आमिष**

**हुडकेश्वर पोलिस ठाण्यात तिघांवर गुन्हे दाखल**

**पोलिसांचे पथक लवकरच अमरावतीत येणार**

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.६अमरावती–** अमरावती शहरातील काँग्रेसच्या तीन पदाधिकाऱ्यांनी नागपुर येथील काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्याला रेल्वे महामंडळावर नियुक्तीचे आमिष देऊन त्यांची १५ लाखांनी फसवणूक केली. आरोपींनी आ.रवि राणा व माजी खा. नवनित राणांच्या नावाचा गैरवापर केला. नागपुर येथील हुडकेश्वर पोलिसांनी स्थानिक तिन्ही आरोपींविरोधात गुन्हे दाखल केले असून हुडकेश्वर पोलिस आरोपींच्या शोधात लवकरच अमरावती येणार आहे.हर्षवर्धन सपकाळ, संदीप देशपांडे, चेतन चौधरी, तिन्ही रा. अमरावती असे गुन्हे दाखल झालेल्या तिन्ही स्थानिक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची नावे आहेत. फसवणूक झालेल्या फसवणूक झाल नागपुर येथील महिला काँग्रेसच्या पदाधिकारीचे नाव भारती सुनील कामडी (३९) नागपुर असे आहे. हुडकेश्वर पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, भारती कामडी या जुलै २०२३ मध्ये पालघर येथे आयोजित काँग्रेसच्या मेळाव्यात सहभागी झाल्या होत्या. तिथेच पदाधिकारी हर्षवर्धन सपकाळ, संदीप देशपांडे, चेतन चौधरी यांच्यासोबत भेट झाली. सर्वजण एकाच पक्षातील असल्याने विदर्भातील असल्याने चौघांमध्ये चांगलीच गट्टी जमली. अशातच तिन्ही आरोपींनी भारती यांना आमची आमदार रवी राणा व त्यांची माजी खासदार पत्नी नवनित राणांसोबत ओळख आहे. त्यांनी पत्नीची रेल्वे महामंडळावर नियुक्ती करून दिल्याने हर्षवर्धन सपकाळ यांनी भारतींना सांगितले. तर आरोपी संदीप व चेतनने हामी दिली. सध्या दशिक्षण पूर्व मध्य रेल्वेच्या महामंडळावर नेमणूक करणे सुरू आहे. तुमची तेथे नियुक्ती करून देतो. त्यामध्ये मोठे कामे होतात असे देखील हर्षवर्धन सपकाळीने भारतींना सांगितले.

## ‘असर’च्या आडून शैक्षणिक साहित्य सरकारी शाळांच्या माथी

**प्राथमिक शिक्षक समितीचा आरोप**

**विदर्भ प्रजासत्ताकदि.६अमरावती–** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांबाबत अधिकाधिक गैरसमज निर्माण करून ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांसह शिक्षकांची अवहेलना होईल अशा प्रकारची मांडणी 'असर' या अहवालातून प्रथम संस्थेकडून केली जात असल्याचा आक्षेप राज्यातील प्राथमिक शिक्षकांनी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या माध्यमातून घेतला आहे.'असर'च्या आडून शैक्षणिक साहित्य सरकारी शाळांच्या माथी मारण्याकरिता हा खटाटोप केला जात असल्याचा गंभीर आक्षेप शिक्षकांनी घेतला आहे.इतकेच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता संपादणुकीचे सर्वेक्षण असरदार व्हायचे असेल तर पुढील वर्षापासून प्रथमच्या कार्यकर्त्यांसोबत संबंधित जिह्यातील शिक्षकांनाही सोबत घेण्यात यावे आणि गुणवत्तेची पडताळणी शालेय कामकाजाच्या वेळेत संबंधित शाळेतच व्हावी, अशी मागणी शिक्षकांनी केली आहे.प्रथम ही गैरसरकारी संस्था शहरी भागातील शाळांचे कोणतेही सर्वेक्षण करत नसून केवळ ग्रामीण भागातील शाळांचेच करते. याकरिता प्रथमचे कार्यकर्ते कोणत्याही शाळेत जात नाहीत. ते गावात पारावर, मैदानावर, रस्त्यावर खेळणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून शैक्षणिक गुणवत्तेची पडताळणी करतात. त्यामुळे हे तथाकथित सर्वेक्षण वास्तवदर्शी व पारदर्शक नसल्याचा आरोप समितीचे राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी केला आहे. संघटनेतर्फे या अहवालाचा निषेध करत अनेक केला आहे. संघटनेतर्फे या अहवालाचा निषेध करत अनेक ठिकाणी त्याची होळी करण्यात येत आहे.

## घुईखेड च्या ऐतिहासिक पाळखी सोहळा

## संजीवन समाधीच्या दर्शनासाठी लोटला भक्तांचा महासागर

### राज्यभरातील १५२ दिंड्या दाखल



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.६चांदूर रेल्वे :** राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारो भाविकांनी बुधवारी १३ व्या शतकातील श्री संत बेंडोजी महाराज यांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेतले. यावेळी काल्याचे कीर्तन व दहीहांडी महोत्सव झाला. संत बेंडोजी महाराजाच्या ऐतिहासीक पालखी सोहळयात राज्यभरातील १५२ दिंड्या सामील झाल्या. लेझीम, बैंड, भजने व हरिनामाच्या गजराने संपूर्ण घुईखेड नगरी भक्तीमय झाली होती. सहभागी झालेल्या दिंड्यांतून ईश्वरचिठ्ठीने काढलेल्या सायंकाळच्या महाआरतीचा मान रुक्मिणी महिला भजन मंडळ (वाई) यांना मिळाला. त्यांचा साडीचोळीने सत्कार करण्यात आला. घुईखेड येथील संत बेंडोजी महाराजाच्या संजीवन समाधी महोत्सवाला ३० जानेवारीपासून प्रारंभ झाला. संगीतमय देवी भागवत कथा प्रवक्ता ह.भ.प. संगीता करंजीकर या होत्या. ४ फेब्रुवारीपर्यंत देवी भागवत कथा दररोज सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ६ या वेळेत झाली. ५ फेब्रुवारी बुधवारी दुपारी १२ ते २ या वेळेत ह.भ.प. उमेश महाराज जाधव (आळंदीकर) यांचे काल्याचे कीर्तन झाले. ह.भ.प. गणेश महाराज व रूपमसिंग सूर्यवंशी यांच्या हस्ते कालावाटपकरण्यात आले. संत बेंडोजी महाराजांच्या सामूहिक आरतीने बुधवारी कार्यक्रमांची सुरूवात झाली. दुपारी २ वाजता बेंडोजी महाराजांच्या पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. यामध्ये घुईखेड येथील बेंडोजी बाबा विद्यालयाच्या दिंडीसह राज्याच्या काना कोपऱ्यातून आलेल्या महि ला व पुरुषांच्या १५२ दिंड्या सहभागी झाल्या होत्या. लेझीम, बँड, भजन व हरिनामाच्या जयघोषात ऐतिहासिक पालखी व दिंड्या संस्थानच्या शेतामध्ये पोहचल्या.

**दहीहंडी सोहळा उत्साहात**

परंपरेनुसार शंभर वर्षांहून अधिकच्या चिंचीच्या झाडाजवळ दहीहंडीचा सोहळा सायंकाळी ५ वाजता मोठ्या उत्साहात पार पडला. सायंकाळी ७ वाजता हजारो भाविक भक्तांनी यात्रेमध्ये महाप्रसादाचा लाभ घेतला.

## जिल्हा बँकेतील पाच संचालकांविरोधात १४ ला अविश्वास सभा



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.६अमरावती–** अमरावती, जिल्हा मध्यवर्ती का सहकारी बँकेतील सत्ता गटात सहभागी ने असलेले संचालक अजय मेहकरे, चित्रा डहाणे, नरेशचंद्र ठाकरे, आनंद काळे आणि जयप्रकाश पटेल या पाच संचालकांविरोधातील अविश्वास प्रस्तावाला उच्च न्यायालयाने मान्यता दिली आहे. त्यामुळे विभागीय सहनिबंधकांच्या आदेशान्वये येत्या शुक्रवारी (१४ फ्रेबुवारी) अविश्वास ठरावासाठी विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे.अविश्वास पारित होण्याकरिता १४ संचालकांचे समर्थन आवश्यक असल्याने या सभेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्हा बँकेत सत्ताबदलानंतर बहुमतात असलेल्या विरोधकांनी अल्पमतातील सत्ताधा–यांविरोधात तक्रारींचा सपाटा सुरू केला आहे. काही दिवसांपूर्वीच सत्ताधाऱ्यांनी उपविधीत केलेल्या दुरुस्त्या विभागीय सहनिबंधकांनी सुनावणी घेऊन फेटाळल्या आहे. अशातच उच्च न्यायालयाने विरोधकांनी पाच संचालकांविरोधातील अविश्वास प्रस्ताव मान्य करीत सदर प्रस्ताव पारित करण्याकरिता सभा घेण्याच्या सुचना विभागीय सहनिबंधकाना दिल्या होत्या. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी बच्चू कडू विराजमान झाले आणि काही दिवसातच अध्यक्ष, उपाध्यक्षपदाला अविश्वासाची मुदत दोन वर्षापर्यंत वाढविण्याची अधिसूचना शासनाकडून काढण्यात आली. त्यामुळे विरोधकांचा त्यांच्या विरोधातील अविश्वास ठरावाचा मनसुबा फसला.

परंतु त्यानंतर विरोधकांनी शिक्षक बँकेच्या एका निर्णयाच्या पार्श्वभुमिवर सत्ताधारी गटातील पाच संचालकांना टार्गेट करीत विभागीय सहनिबंधकाकडे पाच संचालकांविरोधातील अविश्वास प्रस्ताव दाखल केला. परंतु तत्कालिन विभागीय सहनिबंधकांनी तो फेटाळल्याने बबलु देशमुख गटाने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मागील आठवड्यात न्यायालयाने या प्रस्तावाला मंजुरात देत विभागीय सहनिबंधकांना विशेष सभा घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. या आदेशान्वये १४ फेब्रुवारीला दुपारी १ वाजता जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सभागृहात जिल्हा उपनिबंधकांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे आता या सभेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राजेंद्र गोरले यांचा सभापती पदाचा राजीनामा मंजूर

### उपसभापती अमोल चिमोटे यांच्याकडे पदभार

विर्भ प्रजासत्ताक

**दि.६परतवाडा–** अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजेंद्र गोरले यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे पदाचा राजीनामा दिला. तो रोजी जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी मंगळवारी ४ फेब्रुवारीला स्वीकृत केल्याने बाजार समितीचे सभापती पद बुधवारी ५ फेब्रुवारीला रिक्त झाले आहे. त्यामुळे सभापती पदाचा प्रभार उपसभापती अमोल चिमोटे यांच्याकडे सोपविण्यात आला. अचलपूर बाजार समितीचे सभापती राजेंद्र गोरले हे बबलु देशमुख यांच्या सहकार पॅनलकडून संचालक पदावर निवडून सभापती पदी नियुक्त करण्यात आले होते. मात्र, बाजार समितीच्या १३ संचालकांनी सोमवारी ३ फेब्रुवारी रोजी त्यांच्याविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यांकडे अविश्वास प्रस्ताव दाखल केला.त्यापूर्वीच राजेंद्र गोरले यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे आपल्या पदाचा राजीनामा सादर केला. जिल्हा उपनिबंधकांनी त्यांचा राजीनामा स्वीकृत करीत बाजार समितीच्या संचालकांची सभा आयोजित करत संचालकांची निवड प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने निवडणूक प्रक्रियेकरिता नोटीस बजावली. तोपर्यंत उपसभापती अमोल चिमोटे यांच्याकडे सभापती पदाचा प्रभार देण्यात आला.

**यापूर्वी पटोकार यांच्यावर आला होता अविश्वास**

या पूर्वी अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती किशोर पटोकार यांच्यावर अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. पटोकार हे अविश्वास प्रस्तावाला सामोरे गेले होते. त्यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव मंजूर झाला होता.

## १०८ नंबरची रुग्णवाहिका जीवनदायिनीच


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी १०८ क्रमांकाची टोल फ्री रुग्णवाहिका सेवा देते. २०१४ पासून ही सेवा सुरू आहे. जिल्ह्यात आजपर्यंत हजारो रुग्णांनी यासाठी कॉल केले असून रुग्णवाहिकेची सेवा तत्काळ मिळायची. विशेषतः अपघात झाल्यानंतर तसेच गर्भवती महिलांना रुग्णालयात नेण्यासाठी अधिक कॉल येत असल्याची माहिती मिळाली आहे.

**१०८ रुग्णवाहिका किती ?–** महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा अंतर्गत जिल्ह्यात सध्या १९ रुग्णवाहिका अहोरात्र सेवा देत आहेत. जिल्ह्यातील दुर्गम ग्रामीण भागांचा विचार करता रुग्णवाहिकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.जिल्ह्यात १०८ सेवेची २ रुग्णवाहिका अहोरात्र सेवा देते. ही सेवा सुरू ठेवण्यासाठी डॉक्टर, चालक, मेकॅनिक, इतर स्टाफ वादळ, वारा, पाऊस कशाचीही पर्वा न करता तत्पर सेवा देत असल्याचे आरोग्य विभागाने म्हटले आहे.१०८ रुग्णवाहिकेच्या सेवेसाठी वर्षात सर्वाधिक कॉल गरोदर माता, प्रसूती इतर वैद्यकीय सेवेसाठी आले. यामुळे रुग्णांना मोठा आधार मिळाला आहे.कॉल केल्यानंतर तत्काळ सेवा१०८ क्रमांकावर कॉल करून रुग्णांचे नातेवाईक माहिती देतात. त्यानंतर अवघ्या काही वेळात १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका दाखल होत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः ग्रामीण भागात ही रुग्णवाहिका अधिकच उपयोगी पडत आहे.

## गतवर्षीच्या मालमत्ता कर थकबाकीवरील दंड १०० टक्के माफ

### आमदार सुलभाताई खोडके यांचा पुढाकार ठरला महत्त्वाचा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती**

महानगरपालिकेकडून २०२३–२०२४ च्या मालमत्ताकराच्या थकबाकीवर दरमहा दोन टक्के व्याज आकारणी संदर्भात आमदार सुलभाताई खोडके यांनी मनपा प्रशासनासोबत समन्वय साधला असून त्यांच्या निर्देशावरून मनपा आयुक्त सचिन कलत्रे यांनी बुधवारी अधिसूचना जारी केली. त्यानुसार अमरावती शहराच्या मालमत्ताधारकांना थकीत कराच्या रकमेवरील दरमहा २ टक्के शास्तीच्या रकमेवर १०० टक्के सूट प्रदान करण्यात आली आहे.

अमरावती महानगर पालिकेने वर्ष २०२३–२०२४ पासूनच्या मालमत्ताकराची आकारणी ही नवीन वाढीव कर प्रणालीनुसार केली होती.यासंदर्भात आमदार सुलभाताई खोडके यांनी शासनाकडून स्थगिती आणून वर्ष २००५–२००६ ची जुनीच कर प्रणाली लागू करून शहरवासीयांना मोठा दिलासा मिळवून दिला होता. त्याअनुषंगाने महापालिकेने पुनश्च जुन्या मालमत्ता कर प्रणालीनुसार मालमत्तांचे सुधारित मूल्यांकन करून मालमत्ताधारकांना नवीन बिले पाठविली. त्यात थकीत रकमेवर दरमहा २ टक्के व्याज आकारणी करण्यात आली होती. यासंदर्भात आमदार सुलभाताई खोडके यांनी २ जानेवारीला अमरावती महानगरपालिकेच्या कामकाजाचा आढावा घेण्यासंदर्भात बैठक घेतली होती. तसेच २०२३–२४ मालमत्ताकराच्या थकीत रकमेवर दरमहा २ टक्के व्याज आकारणीतूनशहरवासीयांना दिलासा मिळावा, यावर मनपा आयुक्तांशी चर्चा केली. सन २०२३–२०२४ मध्ये मालमत्ताधारकांना कर भरण्यास पुरेसा कालावधी मिळाला नसल्याचे सांगत त्यांना थकीत रकमेवरील शास्तीच्या रकमेतून सवलत देण्याबाबत आमदार खोडके यांनी बैठकीत सूचना केली होती. ज्यामध्ये सन २००५ ते २००६ चे दरानुसार निश्चित करण्यात आलेली मालमत्ताकराची रक्कम, निश्चित करण्यात आलेली मालमत्ता कराची चालू वर्षाची मागणी व थकबाकीच्या एकूण रकमेचा एकमुस्त भरणा ५ फेब्रुवारी २०२५ ते दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत करणाऱ्या मालमत्ताधारकांना थकीत रकमेवरील व्याजातून १०० टक्के सूट मिळणार आहे.–

# बांधकाम कामगारांची नोंदणी आता 'ऑनलाईन'

## बायोमॅट्रीक, कागदपत्र तपासणीही सुविधा केंद्रावरच

### कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची माहिती





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अकोला–** महाराष्ट्रातील कामगारांना त्यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने कुठूनही करता येणार आहे. तसेच त्यांची मूळ कागदपत्रे पडताळणी, फोटो आणि बायोमेट्रीक याकरता प्रत्येक नोंदणीकृत बांधकाम कामगारांना त्यांच्या सोईच्या तारखेला, जिल्हा किंवा तालुका सुविधा केंद्रावर जाऊन करता येणार आहे. यासाठी राज्यात ३६६ तालुका सुविधा केंद्रे निर्माण करण्यात आली आहेत. ही सुविधा राज्यातील सर्व बांधकाम कामगारांना आजपासून म्हणजे ५ फेब्रुवारी २०२५ पासून सुरू करण्यात आली असल्याची माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिली.

बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नुतनीकरण आणि लाभ वाटपाकरीता एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (खथइचड) ही ऑनलाईन प्रणाली आहे. जिल्हा स्तरावर जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राद्वारे यापूर्वी हे काम होत होते. केंद्र शासनाच्या अधिसूचनेद्वारे राज्य शासनाने आता ३६६ तालुका सुविधा केंद्रे निर्माण केली असून प्रत्येक तालुका सुविधा केंद्रावर प्रति दिन १५० अर्ज हाताळण्यात येतील, असे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले.

राज्यात ८ नोव्हेंबर २०२४ पासून सुविधा केंद्रे कार्यान्वित करण्यात आली असून आज अखेर एकूण ५ लाख १२ हजार ५८१ अर्ज ऑनलाईन पद्धतीने हाताळण्यात आले आहेत. सध्या अर्ज तालुका सुविधा केंद्रावरून भरले जात आहेत, यामध्ये कामगारांची काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होते व कामगांचा वेळ व रोजगाराचे नुकसान होत असल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. कामगारांच्या वेळेचे व रोजंदारीचे नुकसान न होता निश्चित वेळेत त्यांचे अर्ज भरले जाणे आवश्यक असून विविध लोकप्रतिनिधी, कामगार संघटना यांच्या विनंतीनुसार यामध्ये अधिकची सुलभता, सुसुत्रता व पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने सुधारीत सूचना देण्यात आल्या असल्याचेही मंत्री फुंडकर यांनी सांगितले.कामगार मंत्री फुंडकर यांनी सांगितले की, लाभ वाटप अर्जाकरिता जिल्हा सुविधा केंद्राचे उशिराची तारीख मिळाली असल्यास ती तारीख रद्द करून त्या कामगारांना तालुका स्तरावर नजीकची तारीख उपलब्ध करून देण्यात येईल. त्याचबरोबर जिल्हा मुख्यालय असलेल्या तालुक्याकरिता अतिरिक्त तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र म्हणून कार्यान्वित करण्यात येईल. जिल्हा सुविधा केंद्रमधील पाच पैकी तीन कर्मचारी हे एंट्री ऑपरेटर म्हणून काम करतील. तर उर्वरीत दोन डाटा एंट्री ऑपरेटर बांधकाम कामगारांना त्याच्या तपशिल बदलाचे काम करतील. बांधकाम कामगारांचे सर्व प्रलंबित अर्ज दिनांक ३१ मार्च २०२५ पूर्वी निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्याने या सर्व कामाकरीता मंडळ स्तरावर समन्वय कक्ष स्थापन करण्यात आला असल्याची माहितीही कामगार मंत्री फुंडकर यांनी दिली आहे.

# पालकांच्या खिशाला बसणार फटका!

## १ एप्रिलपासून शालेय बसच्या भाडेदरात थेट १८ टक्क्यांनी वाढ



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** राज्य परिवहन (एसटी) महामंडळ, रिक्षा–टॅक्सी पाठोपाठ आता विद्यार्थ्यांची ने–आण करणाऱ्या शालेय बससाठीही नागरिकांना अधिक रुपये मोजावे लागणार आहेत. 'स्कूल बस ओनर्स असोसिएशन'ने (एसबीओए) मुंबईसह राज्यात १८ टक्के दरवाढ करण्याची घोषणा केली आहे. नव्या शैक्षणिक वर्षापासून अर्थात १ एप्रिलपासून ही दरवाढ लागू होणार आहे. दरम्यान, विद्यार्थी वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या अवैध वाहनांवर राज्य सरकारने बंदी घातल्यास भाडेवाढ होणार नाही, असेही 'एसबीओए'ने स्पष्ट केले.बस कंपनीकडून वाहनांच्या सुट्या भागांच्या किंमती वाढवण्यात आल्या आहेत. इंधनदरातही वाढ झाली आहे. पार्किंग शुल्क दुप्पट झाल्याने बस चालक–मालकांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे. परिणामी बस देखभाल–दुरुस्ती खर्चात वर्षाला १२ टक्क्यांची वाढ झाली आहे. विद्यार्थी सुरक्षिततेसाठी जीपीएस यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरे आणि इतर सुरक्षा उपकरणे कार्यान्वित करणे अनिवार्य केले आहे. याच खर्चाचा भार बस चालक–मालकांच्या माथी मारण्यात आला आहे. यामुळे नव्या शैक्षणिक वर्षापासून १८ टक्के दरवाढ करण्यात येणार आहे.

### तर दरवाढ नाही ......

मुंबईसह राज्यात शालेय बसव्यतिरिक्त रिक्षा, टॅक्सींमधूनही विद्यार्थी वाहतूक केली जाते. ही वाहतूक बेकायदा आहे. राज्य सरकारने बेकायदा विद्यार्थी वाहतुकीला आळा घातल्यास दरवाढ रद्द करण्यात येईल, असे एसबीओएचे अध्यक्ष अनिल गर्ग यांनी सांगितले.

# ४४ वाळूघाटांचा होणार लिलाव, सुधारित धोरणावर ७ फेब्रुवारीपर्यंत हरकती व सूचना मागितल्या

## अखेर शासकीय डेपो पद्धती रद्द



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती –** राज्यात गत दोन वर्षांपासून सुरू असलेल्या शासकीय वाळू डेपो पद्धतीत प्रशासनासह कंत्राटदारांनादेखील अडचणी निर्माण होत असताना शासनाकडून ही पद्धती रद्द करीत सुधारित नवे धोरण निश्चित करण्यात आले आहे, यावर शासनाकडून ७ फेब्रुवारीपर्यंत हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. या प्रक्रियेनंतर फेब्रुवारीच्या अखेरीस या सुधारित धोरणाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.सन २०२३–२०२४ या कालावधीत वाळू निर्गतीसाठी डेपो पद्धतीचा उपयोग करून वाळू डेपोमार्फत नागरिकांना वाळू उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. डेपोमार्फत वाळू उपलब्ध करून देण्यात आलेल्या अडचणी डेपो पद्धती व लिलाव पद्धती यामधील गुण–दोष यांचा विचार करून वाळू निर्गतीसाठी सर्वकष सुधारित धोरण विहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार आता महसूल विभागाकडून नवे सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे डेपो पद्धती रद्द करीत जुन्याच पद्धतीने वाळूघाटांचा लिलाव केल्या जाणार आहे. जिल्ह्यात ४४ वाळूघाट उपलब्ध आहेत, यामधून गावातच नागरिकांना वाळू कशी उपलब्ध होईल, याचा विचार करण्यात आला आहे.सुधारित धोरणात वाळू गटामधून वाळूचे उत्खनन करणे, तसेच पारंपारिक व्यवसाय करणार्या स्थानिक व्यक्तींना हातपाटी–डुबी पद्धतीने विना लिलाव परवाना पद्धतीचा वापर करून वाळू गट उपलब्ध करून देणे, खासगी शेतजमिनीमध्ये नैसर्गिक कारणामुळे अथवा इतर कारणामुळे जमा झालेली वाळू निष्कासन करून शेतजमीन लागवडी योग्य करण्यासाठी वाळूचे निष्कासन करणे व मोठ्या खाणीमधील ओव्हर बर्डनमधून निघणार्या वाळूचा वापर करणे आदीची वाळू धोरणामध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आली आहे.

# सून खाऊ घालेना , पोरगाही बघेना जेष्ठ नागरिकांची मदतीची याचना



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि .६अमरावती**

ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या १४५६७ या टोल फ्री क्रमांकाच्या हेल्पलाइनवर जिल्ह्यातून वर्षभरातहजारो ज्येष्ठ नागरिकांनी कॉल करूनतक्रारींसह मदतीसाठीही हाक दिली.त्यात सूनेकडून दैनंदिन होणारा त्रास, मुले वागवत नसल्याच्या तक्रारीं सह कौटुंबिक त्रासाबाबतच्या बहुतांश तक्रारींचासमावेश आहे. त्याचप्रमाणे त्यांचे हक्क,कायदे, भावनिक आधारासह इच्छापत्र, मालमत्तेच्या वादाबाबत मार्गदर्शनघेण्यासाठीही या हेल्पलाइनवर ज्येष्ठनागरिकांनी संपर्क साधला आहे.बदलती जिवनशैली, आचार विचारांतअसलेला मोठा फरक जेष्ठ आणित्याच्या मुलांमध्ये वादाचे कारण ठरतआहे. बऱ्याचदा शाब्दिक वादाचे कारणमारहाणीवर येत असल्याचे दिसून येतेआहे.ज्येष्ठांना त्यांच्या कुटुंबातील त्रासांचीखूप मोठी समस्या असल्याच्या तक्रारीसातत्याने वाढत आहे. हेल्पलाईन वर आलेल्या तक्रारींमध्ये, ज्येष्ठ नागरिकांनीसांगितले की, त्यांना सून खाऊ घालतनाही आणि मुलगादेखील त्यांचीदेखभाल करत नाही. अनेक वृद्धलोकांची अशीच स्थिती असून, ते यापरिस्थितीत असाहाय्य होऊन कौटुंबिकआणि वैयक्तिक त्रास सहन करत आहेत.

**वर्षभरात हजारो कॉल ....**

शासनाने जारी केलेल्या १४५६७ या हेल्प लाईन वर वर्षभरात हजारो जेष्ठ नागरिकांनी कॉल केले आहेत . त्यात तक्रारीसह मदत व मार्गदर्शन मिळण्यासाठीच्या कॉल्सचाही समावेश आहे.

**घराबाहेर काढल्याच्या तक्रारीत सातत्याने वाढ ...**

नवदाम्पत्यात घरातील वृद्ध मंडळी अडसळ होत आहे . मुलांच्या चुकीच्या वर्तवणुकीला टोकले असता सून मुलांकडून सरार्स शिवीगाळ केल्याचे तक्रारीत दिसून आले.

**हेल्पलाईन क्रमांक १४५६७**

जेष्ठ नागरिकांसाठी केंद्र सरकारने १४५६७ हा हेल्पलाईन क्रमांक सुरु केला आहे. या हेल्प लाईन वर कॉल करून जेष्ठ नागरिकांना मदत मिळते .


**काय मदत मिळते ....**

१. जेष्ठ नागरिकांना शासनाच्या वतीने हेल्पलाइन जारी करण्यात आली आहे. यात माहिती, मार्गदर्शन, भावनिक आधार, व क्षेत्रीय पातळीवरील मदत या चार प्रकारच्या सेवा दिल्या जातात.

२. यात जवळचे हॉस्पिटल, डे– केयर सेंटर, वृद्धाश्रम , मेडिकल याबबाबींची माहिती दिली जाते. तसेच वकिलाकडून कॉलवर मार्गदर्शनही केले जाते.

३. अशी घटना उद्धवल्यास पोलिसांकडून तात्काळ मदत केली जाते . तक्रार नोंदवून घेत मुलांचे समुपदेशन केले जाते . वेळे प्रसंगी पोलिसात वृद्धांचा छळ केल्या प्रकरणी मुलगा, सुनेवर गुन्हा देखील नोंद केला जातो.

# शिष्यवृत्ती, फ्रिशिप हवी तर करा अर्ज १०० टक्के नोंदणी करण्याचे आवाहन




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–**

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व फ्रिशिप योजना आहे. चालू शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता महाडीबीटी प्रणालीद्वारे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता भा.स.शि. फ्रीशिप, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठ्यक्रमास शिक्षण घेत असणार्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन व अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना या पाच योजनांचे नवीन व नूतनीकरणाच्या अर्जाची महाडीबीटी प्रणालीद्वारे स्वीकृती सुरू झाली आहे. अर्ज ८ फेब्रुवारीपर्यंत सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयास पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती तसेच राज्य शासनाची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती (फ्रीशिप) या योजनांकरिता चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत चालू शैक्षणिक वर्ष २०२४–२५मध्ये केवळ ८३ टक्के व ७१ टक्के अर्ज नोंदणीकृत झाली. महाडीबीटी प्रणालीवर ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज नोंदणी केलेली नाही, मागील वर्षातील अर्ज जुटी पूर्ततेकरिता विद्यार्थी स्तरावर प्रलंबित आहे, अशा अर्जदारास त्यांचा अर्ज सादर करावा लागणार आहे. महाविद्यालयाने प्रवेशित अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे १०० टक्के अर्जाचे नोंदणी होईल या दृष्टीने प्रयत्न करावे लागणार आहे. यासाठी जनजागृती केली जात आहे.

### प्राचार्य राहणार जबाबदार

महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत विद्यार्थ्यांची द्वितीय सत्राची उपस्थिती अद्ययावत करावी लागणार आहे. विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुरीसाठी विभागास पाठवावे लागणार आहे.महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित राहिल्यास राहून विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास प्राचार्यांना जबाबदार ठरविण्यात येणार असल्याचे सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी कळविले आहे.

# सहा हजार विद्यार्थ्यांचे पालकत्व अन् ३५ सेवा शैक्षणिक सेवेचा समाज वसा

### वाघोली येथील शिक्षिका स्मिता मांडवगणे यांचा सेवानिवृत्त सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६धामणगाव रेल्वे**

तालुक्यातील वाघोली येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका स्मिता प्रमोद मांडवगणे ह्या सेवानिवृत्त झाले.सेवानिवृत्ती बद्दल निरोप समारंभ ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या सेवानिवृत्तीच्या निरोप समारंभात अनेकांचे डोळे पाणावले. संयमी तेवढयाच शांत.शाळेतील प्रत्येक विद्यार्थी म्हणजे आपला पाल्य हे मनात विचार ठेवत तब्बल ३५ वर्ष सेवा करीत सहा हजार विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारले होते.त्यांना कपडे पुस्तकच नव्हे तर आरोग्य असो की दिवाळीला कपडे, गोडधोड पदार्थ त्यांच्या घरापर्यंत पोहोचून गरीब विद्यार्थ्यांसोबत दिवाळी साजरी करणाऱ्या, सुखदुःखात सहभागी होणाऱ्या स्मिता प्रमोद मांडवगणे सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या या सेवानिवृत्तीचा सोहळा पाहून अनेकांचे डोळे पाणावले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच निशांत हेंडवे हे होते.ग्रामपंचायत सदस्य अतुल इंगोले,सोनाली भोकरे,हसीना पठाण, निशा चौहान, तरुण घासले ,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल तुमसरे,रूपाली धवणे, प्रशांत पाकोडे,कविता सिरसोदे,प्रमोद मांडवगणे,माजी सरपंच सलीम पठाण,विजय गायकवाड ,माजी पोलीस,सुभाष गायनर,मुख्याधापक सुनिल कांबळे,शिक्षक राजु पानतावणे,मनीषा शेंडे,प्रणाली कालमेघ व आदी प्रामुख्याने उपस्थित होते.सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसणाऱ्या व्यक्ती कसा असावा यांचे ज्वलंत उदाहरण म्हणजे स्मिता मांडवगणे यांचे नाव पुढे येते. यांनी शून्यातून विश्व निर्माण केले आहे.आपण ज्या परिस्थितीतून आलो त्या परिस्थितीतील विद्यार्थी खूप शिकले पाहिजे तेही अधिकारी झाले पाहिजे असे त्यांनी स्वप्न मनाशी बाळगले होते. त्यांनी शिकवलेले अनेक विद्यार्थी कुठे अधिकारी तर कुठे राजकीय क्षेत्रात मोठे पदाधिकारी आहेत. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात स्वतःच्या कुटुंबाचा विचार न करता शैक्षणिक सेवा केली. त्यांच्या सेवानिवृत्तीचा सोहळा ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा आपल्या भाषणातून माहिती सांगताना अनेकांच्या डोळ्यात पाणी आले .३५ वर्षे शैक्षणिक क्षेत्रातील स्वच्छ प्रतिमा त्यांनी कायम ठेवली.सर्वोत्तम शेरा त्यांच्या सेवा पुस्तकात सातत्याने पहायला मिळाला.त्या केवळ त्यांच्या पारदर्शकपणामुळे सर्वसामान्य व्यक्ती या सर्वांनी त्यांना भावी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. एवढेच नव्हे तर ज्या ज्या शाळेत सेवा दिली त्या शाळेतील विद्यार्थ्यांनी सकाळपासून साठी एकेएक पुष्पगुच्छ घेऊन सायंकाळी सात वाजेपर्यंत या शाळेत आले होते.त्यांनी दिलेल्या या शैक्षणिक सेवेचा समाज वसा अनेकांना पाहायला मिळाला.

# तुम्ही भाड्याच्या घरात राहता? मग Rent देताना समजून घ्या GSTचे नियम

## कोणाला द्यावा लागेल कर, कोणाला सूट




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** तुम्ही भाड्याच्या घरात राहत असाल किंवा भाड्याच्या घरात काही व्यवसाय करत असाल तर तुमच्यासाठी एक खूप महत्वाची बातमी आहे. तुम्हाला माहिती आहे का की जीएसटी किंवा वस्तू आणि सेवा कराच्या नवीन नियमांतर्गत भाड्याच्या घरात राहणाऱ्या लोकांसाठी एक महत्त्वाचा नियम लागू करण्यात आला आहे? जीएसटी नियमांत अलीकडेच याबाबत दुरुस्ती करण्यात आली आहे.

२०१७ मध्ये भारतात जीएसटी कायदा लागू करण्यात आला, जो संपूर्ण भारतात वस्तू आणि सेवांच्या निर्मिती, विक्री आणि वापरावर आकारला जाणारा अप्रत्यक्ष कर आहे. जीएसटी कायद्यात काही स्लॅब तयार करण्यात आले आहेत, ज्याअंतर्गत ऋढढ कराची टक्केवारी म्हणजेच, एखाद्या वस्तूवर किती टक्के जीएसटी आकारला जाईल, निश्चित करण्यात आली. तुम्हाला माहिती आहे का की जीएसटी किंवा वस्तू आणि सेवा कराच्या नवीन नियमांतर्गत भाड्याच्या घरात राहणाऱ्या लोकांसाठी एक महत्त्वाचा नियम लागू करण्यात आला आहे?

भाड्याच्या घरावर ऋढढ नियम काय सांगतो

आता प्रश्न उद्भवतो की तुम्ही राहता त्या भाड्याच्या मालमत्तेवरही टॅक्स आकारला जाईल का? जीएसटी परिषदेच्या ४७ व्या बैठकीत भाड्यावर १८% जीएसटी लावण्याचा निर्णय घेण्यात आला, जो १८ जुलै २०२२ रोजी लागू करण्यात आला. पण, सर्वसामान्य लोकांना भाड्यावर कर भरावा लागणार नाही, असे कर तज्ञांचे म्हणणे आहे. भाड्याने घेतलेले घर व्यावसायिक कामासाठी वापरणाऱ्या अशा भाडेकरूंना जीएसटी भरावा लागेल. जीएसटी नियमांनुसार याआधी व्यावसायिक मालमत्तेवरील कार्यालय किंवा किरकोळ जागेचे भाडेपट्टा किंवा भाड्याने देण्यावर जीएसटी आकारला जात होता. पण, नवीन नियमांनुसार आता निवासी मालमत्तेत राहणाऱ्या भाडेकरूंनाही जीएसटी भरावा लागेल. मात्र हा टॅक्स फक्त जीएसटी अंतर्गत नोंदणीकृत भाडेकरूंकडूनच वसूल केला जाईल.

त्याचवेळी, सरकारनेही ट्विट करून भाड्यावर कोणाकडून आणि कोणत्या परिस्थितीत १८% जीएसटी आकारला जाईल याबाबत माहिती दिली. यानुसार निवासी मालमत्तेच्या भाड्यावर केवळ व्यावसायिक संस्थेने वापरल्यास जीएसटी आकारला जाईल. त्याचवेळी, तुमचं घर/फ्लॅट किंवा जमीन एखाद्या खाजगी व्यक्तीला वैयक्तिक वापरासाठी दिले तर त्यावर जीएसटी लागू होणार नाही. एवढेच नाही तर जर कोणत्याही फर्मचा मालक किंवा भागीदार वैयक्तिक वापरासाठी भाड्याने घर घेत असेल तर त्यावरही जीएसटी लागू होणार नाही.

म्हणजेच, एखाद्या भाडेकरूने निवासी मालमत्ता भाड्याने घेतली आणि तिथे व्यवसाय चालवत असेल तर मग, त्याला १८% जीएसटी भरावा लागेल. जीएसटी नियमांनुसार, भाडेकरूला रिव्हर्स चार्ज मेकॅनिझम म्हणजेच ठउच् अंतर्गत कर भरावा लागेल, ज्यासाठी नंतर जीएसटी रिटर्नचा दावा केला जाऊ शकतो.


# मंडळाच्या परीक्षेवेळी झेरॉक्स दुकानास ठोकणार कुलूप, आता शासकीय स्टाफ पण दिमतीस

## ५०० मिटर अंतराच्या आंत येणारे सर्व झेरॉक्स दुकाने बंद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

यावर्षी दहावी व बारावीच्या परीक्षेबाबत शिक्षण मंडळ व शासन विशेष सतर्क झाले आहे. या परीक्षा कॉपीमुक्त करण्याचा चंग आहे. म्हणून आवश्यक त्या सर्व उपाययोजना सूरू आहे. परीक्षा केंद्रावरील केंद्राचालक, पर्यवेक्षक व अन्य कर्मचारी यांची अदालबदल करण्याचा निर्णय शिक्षक संघटनानी विरोध केल्याने मागे घेण्यात आला. पण २०१८ ते २०२४ या कालावधीत ज्या परीक्षा केंद्रावर कॉपीची प्रकरणे दिसून आली, त्या केंद्रावर मात्र अन्य कर्मचारी नेमल्या जाणार असल्याचे सूचित आहे. या केंद्रावरील केंद्र संचालक व पर्यवेक्षक बदलण्याचा निर्णय झाला आहे.

महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ काही महत्वाचे निर्णय अंमलात आणणार आहे. पेपर असणाऱ्या दिवशी परीक्षा केंद्राच्या परिसरातील ५०० मिटर अंतराच्या आंत येणारे सर्व झेरॉक्स दुकाने बंद केल्या जाणार आहेत. राज्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र परिसरात ड्रोन कॅमेरा द्वारे निगराणी राहील. जिल्हा प्रशासन सतर्क राहील. त्यांच्या माध्यमातून परीक्षा केंद्रावरील अपेक्षित भौतिक सुविधा व्यवस्थित आहे अथवा नाही याची खतरजमा एक दिवस आधीच करण्यात येणार आहे. तसेच जिल्हा प्रशासन केंद्राच्या बाहेर व्हिडिओ चित्रीकरण करीत सर्व त्या हालचाली टिपणार.



कॉपीमुक्त परीक्षा हे उदिष्टय आहे. म्हणून जिल्ह्यातील सर्व विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना जबाबदारी देण्यात येणार आहे. ते प्रामुख्याने सर्व परीक्षा केंद्रावर भरारी पथके व बैठी पथके उपलब्ध होण्याचे नियोजन करतील. एक आणखी विशेष तपासणी आहे. केंद्रचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित प्रत्येक घटकाची चेहरा ओळख म्हणजे फेसीयल रिकग्निशन सिस्टीमद्वारे तपासणी होणार. सर्व घटक हे अधिकृत ओळखपत्र धारण करतील. महाराष्ट्र गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा १९८२ अंतर्गत कारवाई करण्याची सूचना झाली आहे. गैरप्रकारांना मदत करणारे व प्रत्यक्ष गैरप्रकार करणारे यांच्यावर दाखलपात्र व अजामीनपत्र गुन्हा दाखल केल्या जाणार आहे. केंद्र परिसरात १४४ कलम लागू होईल. या परीक्षा पूर्णतः निकोप, पारदर्शी व कॉपीमुक्त होण्यासाठी मंडळ व शासनाने कंबर कसल्याचे दिसून येते. शासनाने या परीक्षा यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी, पालक, शिक्षक व परीक्षेशी संबंधित सर्व घटक यांना दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त करण्यास सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# कोट्यवधींचा खर्च, तरीही परिस्थिती 'जैसे थे'च, मेळघाटात यंदाही पाणीटंचाईचे चटके

## मेळघाटातील जवळपास ६० गावांना टँकरव्दारे पाणीपुरवठा होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मेळघाट**

यंदा देखील उन्हाळ्यात ग्रामीण भागाला पाणी टंचाईचा फटका सहन करावा लागणार आहे. जिल्हापरिषदेच्या पाणी पुरवठा विभागात सध्या टंचाई निर्मुलन आराखड्याची तयारी सुरू असून यंदा मेळघाटातील जवळपास ६० गावांना टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्याची वेळ प्रशासनावर येणार आहे. अद्यापही काही तालुक्यांची मागणी येणे बाकी आहे.




जिल्ह्यात मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातच सर्वाधिक टंचाई जाणवत असते. तर काही प्रमाणात धारणी, चांदूरेल्वे तालुक्यातील गावांचा त्यामध्ये समावेश असतो. यंदा सुद्धा चिखलदरा तालुक्याला डोळ्यासमोर ठेवून कृती आराखडा तयार केला जात आहे. साधारणपणे जानेवारी महिना संपताच अनेक गावांत पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होत असते. मेळघाटातील अनेक गावांतील नागरिकांना गावाबाहेरील वाड्यांमधून पाणी आणावे लागते. असाच क्रम मागील अनेक दशकांपासून सुरू आहे. प्रस्तावित उपाययोजनांनुसार यंदाचा आराखडा जवळपास अडीच कोटींचा राहणार आहे. अद्यापही तीन ते चार तालुक्यांकडून माहिती अप्राप्त असल्याने पाणी टंचाई निर्मुलन आराखडा रखडला आहे.

नवीन नळयोजना, विहीरींचे खोलीकरण करुन गाळ काढणे, खासगी विहीरींचे अधिग्रहण, नळयोजनेची विशेष दुरुस्ती, तात्पुरती पूरक नळयोजना घेणे, टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे, विंधन विहीरीची विशेष दुरूस्ती आदी उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ पर्यंतच्या तिमाहीत पाणीटंचाई निवारणाच्या कामांवर २९.२२ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील २० गावांमध्ये नळ दुरुस्ती, टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि विहिरी अधिग्रहित करण्याच्या कामांवर हा निधी खर्च करण्यात आला आहे. उन्हाळी हंगामाच्या पहिल्या तीन महिन्यांचे नियोजन अद्याप झालेले नाही. जानेवारी ते मार्च या तिमाहीचे पाणीटंचाईचे नियोजन डिसेंबर संपण्यापूर्वीच तयार केले जाते. पण अद्यापपर्यंत गावांमधून प्रस्ताव आले नसल्याचे कारण दिले जात आहे. जिल्ह्यातील ७७६ गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. यातील बहुतांश गावे ही चिखलदरा तालुक्यातील दुर्गम गावे आहेत.

मागील वर्षी जिल्ह्यातील जवळपास ७०० ते ८०० गावांमध्ये टंचाईच्या झळा सोसाव्या लागल्या होत्या, तर २० गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ प्रशासनावर आली होती.मागील काही वर्षात चिखलदरा तालुक्यातील गावांची टंचाई दूर करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च शासनाने केला आहे. मात्र तरीसुद्धा टंचाईची परिस्थिती जैसे थेच आहे. चिखलदरा व मेळघाटमधील भौगोलिक परिस्थिती त्यासाठी जबाबदार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. पाण्याचा साठा होत नाही तसेच अन्य समस्या त्यासाठी कारणीभूतच आहेत. मात्र शासनाकडून अद्याप स्थायी पाणीपुरवठा योजनाच तयार होत नसल्याचे वास्तव यानिमित्ताने समोर आले आहे. मागील वर्षी तर जून जुलैपर्यंत अनेक गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला होता.

# मनुष्यबळाच्या अभावामुळे जिल्ह्यात पशुगणनेचे काम संथ गतीने

## २८ फेब्रुवारी पर्यंत पशुगणना पूर्ण करण्याचे प्रशासनासमोर आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

जिल्ह्यात नोव्हेंबरमध्ये २१ की पशूगणना सुरू झाल्यानंतर मनुष्यबळाच्या अभावामुळे आजवर केवळ ५० टक्केच काम पूर्ण झाले आहे. २८ फेब्रुवारी ही पशु गणना पूर्ण करण्याची अंतिम तारीख असून, २२ दिवसांत उर्वरित ५० टक्के काम पूर्ण करण्याचे आव्हान पशु संवर्धन विभागापुढे आहे.



पशूगणना अपूर्ण असल्याने अद्याप जिल्ह्यात दुधाळ जनावरे किती, परराज्यात आढळणारी काही जनावरेही जिल्ह्यात आहेत काय, कुक्कुट पक्ष्यांची संख्या किती? त्यांच्यावर रोग प्रतिबंधक लसीकरण झाले की नाही, त्याचप्रमाणे गायी, म्हैस या दुधाळ जनावरांनाही रोग प्रतिबंधक लसी दिल्या की नाही, कारण त्यांचे दूध हे सर्वसामान्यांच्या आहारात समाविष्ट असते. याबाबत पूर्ण माहिती मिळवण्यासाठी पशूगणना महत्त्वाची असली तरी मनुष्यबळाच्या अभावाने त्यात दिरंगाई होत आहे. कुक्कुटासह बकऱ्याचे मांस, अंडी, दूध व दुधापासून निर्मित विविध पदार्थांचा आहारात समावेश केला जात असल्याने तसेच जनावरांची ओळख, वैशिष्ट्य पटवण्यासाठी पशूगणना गरजेची असून, याबाबत उदासीनता ही सर्वसामान्यांच्या आरोग्यासाठी घातक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. पशुगणनेमुळे जिल्ह्यात दुधाळ जनावरे किती, चाऱ्याच्या अभावी त्यांची संख्या घटली काय, शेतकरी मित्र पशू किती - याबाबत तर माहिती मिळणारच असून, यामुळे मोकाट जनावरांचा प्रश्नही सुटणार आहे. कारण, रस्त्यावरील मोकाट जनावरे कोणाची याबाबत माहिती मिळून थेट पशु पालकालाच दंड करणे शक्य होणार आहे. तसेच जिल्हा पशुधनाबाबत किती समृद्ध आहे, याचीही माहिती या पशु गणनेमध्ये मिळणार आहे. पशूगणना निर्धारित वेळेत पूर्ण झाली तरच हे शक्य आहे. शेतकऱ्यांसाठी पशूपालन हा जोडधंदा आहे. अनेक कुटुंबांना उत्पन्न व पोषण सुरक्षा देणाऱ्या पशुधनाचे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान आहे. देशात १९१९ पासून दर पाच वर्षांनी पशुगणना सुरू आहे. यापूर्वी २०१९ मध्ये २० वी पशुगणना झाली होती. आता २१ वी पशुगणना २५ नोव्हेंबर २०२७ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पूर्ण करण्यात येत आहे. जिल्ह्यात २ हजार २८४ गावांमधून पशुगणना होणार आहे. यात २ हजार १७ ग्रामीण तर २६६शहरी वार्डाचा समावेश आहे. आजवर १ हजार २७६ गावांमध्ये पशूगणना आटोपली असून यामध्ये ३ लाख ८ हजार ३५६ जनावरांचा शोध घेण्यात आला आहे. मागील २० व्या पशुगणनेत जिल्ह्यात एकूण ५ लाख ९४ हजार पशुधन होते. या मोहिमेत नवजात, तसेच दुग्धोत्पादनासाठी असलेल्या गाई, म्हैस, शेळी-मेंढी यासह श्वान, अश्व, वराह, कुक्कुट पक्षी यांची गणना केली जात आहे. पशुधन लोकसंख्येबाबत सर्वसमावेशक माहिती गोळा करण्याबरोबरच रोग नियंत्रण, जाती सुधारणा आणि पशुधन क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणे, पशुधन क्षेत्रातील कल, नमुने व आव्हाने ओळखणे, संसाधनांचे योग्य वाटप सुनिश्चित करण्यासाठी मदत होणार आहे. जिल्ह्यात पशुगणनेसाठी २३४ प्रगणक आणि ५९ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहरी भागात ५० प्रगणक तर १५ पर्यवेक्षकामार्फत हे काम सुरू आहे.

### पशुधनाच्या माहितीचे संकलन महत्वाचे

पशुगणनेमुळे गुरांची नेमकी संख्या स्पष्ट होते. त्यानुसार शासनाकडून धोरण, योजना आखल्या जातात. निधीची उपलब्धता केली जाते. शिवाय पशुवैद्यकीय दवाखाना कार्यक्षेत्रात किती पशुधन आहे. त्यानुसार लसीकरणासाठी औषधांचा पुरवठा केला जातो. पशुसंवर्धन विभागाकडून दर पाच वर्षांनी पशुगणना करण्यात येते.डॉ. संजय कावरे, उपायुक्त, पशू संवर्धन विभाग.

# किरीट सोमय्या यांची अंजनगाव सुर्जी पोलिसात तक्रार दाखल

## बांगलादेशी रोहिंग्यो प्रकरण तापले : अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अंजनगावसुर्जी**

गेल्या महिन्याभरापूर्वी भाजप चे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी मालेगाव नंतर अमरावती जिल्ह्यातील अंजनगावसुर्जी येथील तहसिलदारांनी बांगलादेशी रोहिंग्यांना जन्म नोंदीचे आदेश केले असल्याचा आरोप करताच शहरात मोठी खळबळ माजली होती आणि तालुका प्रशासनासह जिल्हा प्रशासन येथील तहसिलदारांनी आदेश केलेल्या व पेंडिग असलेल्या केसेस तपासणी साठी युद्ध पातळीवर कामाला लागले होते परंतु सोमवारी (ता.०६) किरीट सोमय्या यांनी अंजनगावात दाखल होऊन पोलिसात तक्रार दाखल केली असल्याने सबंधित कामकाज करणाऱ्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले असून पोलीस तपासाअंती काय समोर येते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अंजनगावसुर्जी तालुक्यात बांग्लादेशी रोहिंग्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा घोटाळा झाला असल्याचा आरोप किरीट सोमय्या यांनी केला आहे



यापूर्वी १२ जानेवारीला त्यांनी अंजनगावात येऊन चौकशी समितीची भेट घेऊन माहिती घेतली होती परंतु महिन्याभरात काही समोर न आल्याने त्यांनी गुरुवारी (ता.०६) अंजनगावसुर्जी पोलीस स्टेशन गाठले व पोलिसात काही पुराव्यानिशी तक्रार दाखल केली व पत्रकारांशी बोलताना अंजनगावसुर्जी बांगलादेशी रोहिंग्याच्या प्रकरणी एसआयटी स्थापन झालीय. जिल्हाधिकारी यांनी सुद्धा समिती स्थापन करून चौकशीचे आदेश दिले होते. जिल्हाधिकारी यांच्या चौकशी समितीने थातूरमातूर चौकशी करून अधिकाऱ्यांना वाचवण्यासाठी चौकशी केली असल्याचा गंभीर आरोप किरीट सोमय्या यांनी जिल्हाधिकारी यांच्यावर केला.किरीट सोमय्या पुढे म्हणाले की आकडे माझ्या हातात आहेत. भारतात जन्म-मृत्यू नोंद कायदा १९६९ मध्ये अंमलात आला व नव्या कायद्यानुसार जन्म प्रमाणपत्र देण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले मात्र यात मोठं षडयंत्र रचण्यात आले असून ज्यांची नगर पालिका व ग्राम पंचायत मध्ये जन्माची नोंद नाही त्यांचे दाखले काढण्याचा सपाटा सुरू झाला यासाठी काही दलाल तहसील कार्यालयातील कर्मचारी आणि काही एनजीओ यांच्या संगनमताने हा प्रकार करण्यात आला असुन अंजनगावसुर्जी तहसील कार्यालयातून अनेक बनावट जन्म दाखल्याचे आदेश दिल्याचा गंभीर आरोप भाजपा नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी अंजनगावसुर्जी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली असता सांगितले आहे

# सोनिया गांधी व राहुल गांधीविरोधात जिल्हाकचेरीवर मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मूरमु यांच्या अभिभाषना बद्दल अभद्र वक्तव्य केल्या विरोधात सकलआदिवासी समाजातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर गुरूवारी निषेध मोर्चा काढण्यात आला. तसेच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सन्मानार्थ रक्तदान शिबीर देखील घेण्यात आले .काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा पुअर लेडी असा उल्लेख केल्याने तसेच अर्थसंकल्पावरील राष्ट्रपतींच्या अभिभाषनाला कंटाळवाणे भाषण, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. हा महामहिमराष्ट्रपतींसह सकल आदिवासी समाजाचा अपमान



असल्याचा बिरसा क्रांती दलाच्या वतीने करण्यात आला. या निषेधार्थ इर्विन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत निषेध मोर्च्या काढण्यात आला. यावेळी आदिवासी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# शिवसेना (उबाठा) चे जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन : शिवसैनिकांचा जिल्हाधिकारी कार्यालयात शिरण्याचा प्रयत्न, पोलिसांची नाकेबंदी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

राज्य सरकारच्या कृषी धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त करत आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) च्या कार्यकर्त्यांनी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार आंदोलन केले. जिल्हाप्रमुख परागगुडधे,प्रकाश मरोटकर यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

सोयाबीनला ८ हजार, कापसाला १० हजार आणि तुरीला १२ हजार रुपये प्रति क्विंटल भाव द्यावा, तसेच नाफेड मार्फत सोयाबीन खरेदी सुरू करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. यावेळी पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात असतांना, घोषणाबाजीने परिसर दणाणला शिवसैनिक जिल्हाधिकाऱ्यांना भेटण्याचा आग्रह धरत होते, मात्र पोलिसांनी गेटवरच त्यांना अडवले. यामुळे संतप्त कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली. काही क्षण वातावरण तणावपूर्ण झाले होते, मात्र पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवली. तर आक्रमक



झालेल्या शिवसैनिकांनी जिल्हाधिकारी कार्यालय येत असलेल्या मंत्री दादाजी भुसे यांच्या ताफ्यातील वाहनावर कपाशी व तुरीचे झाड फेकण्याचा प्रयत्न केला. यावेळी शिवसेनेच्या नेत्यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला.

## मंत्री दादा भुसेंच्या ताफ्यावर कापूस फेकला

अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचून ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी ठिय्या आंदोलन सुरु केले. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांनी सरकारच्या विरोधार जोरदार घोषणाबाजी केली. यादरम्यान पोलिस आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये सौम्य बाचाबाची झाली. ठाकरे गटाचे अमरावतीचे जिल्हा प्रमुख पराग गुधडे कार्यकर्त्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयाचे गेट उघडून आत घुसले. त्यांनी सोयाबीन, कापूस, तूर आणि गहू सोबत आणले होते. दरम्यान मंत्री दादा भुसे जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले होते. तेव्हा आंदोलनकर्त्यांनी दादा भुसे यांच्या ताफ्यातील वाहनांवर कापूस, तूर, सोयाबीन फेकले.

